मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भाजपाचे समृद्ध लाभार्थी संपर्क अभियान

## लोकसभा निवडूक तयारी : कासारवाडीमधून अमित गोरखे यांच्या उपस्थितीत सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी विधानसभेत समृद्ध लाभार्थी अभियानाची सुरुवात कासारवाडी येथून झाली. पंतप्रधान मोदीजींच्या दहा वर्षाच्या कार्यकाळात गोरगरिबांपर्यंत सरकारी योजनेचा लाभ मिळालेल्या लाभार्थ्यां पर्यंत पोहोचणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. या दहा वर्षाच्या कार्यकाळात देशात मोठ मोठे बदल घडून आले तसेच देशातील नागरिकांना सरकारच्या माध्यमातून वेगवेगळ्या योजनेचा लाभ मिळावा त्यासाठी नवनवीन योजना आणल्या यावेळी पिंपरी विधानसभा निवडणुक प्रमुख अमित गोरखे यांनी लाभार्थ्यांशी थेट संवाद साधला, त्यांचे मोदींजीं बद्दलचे मत जाणुन घेतले.

या देशाला बलशाली भारत बनवायचा आसेल तर फक्त आणी फक्त मोदिजीच हे करु शकतात हा आत्मविश्वास तेथील नागरिकांनी



दर्शवला. अगदी भाजी विक्रेत्या पासून ते किराणा मालाच्या दुकानापर्यंत अगदी बांगडी भरणारी महिला सुद्धा मोदींमुळे काय फायदा झाला हे सांगत होत्या, कोरोना काळात मिळालेली मोफत लस असेल मोफत अन्नधान्य पुरवठा असेल बाळंतपणात मिळालेला निधी असेल अपंगांना मिळालेला निधी असेल किंवा रोजगारासाठी मुद्रा योजनेतून घेतलेले लोन असेल असे अनेक लाभार्थी या भागात संपर्क करताना भेटले व प्रत्येकाने कुठल्या ना कुठल्या माननीय पंतप्रधान मोदीजींच्या काळातील शासनाचा लाभ घेतल्यामुळे पुन्हा एकदा पंतप्रधान मोदीजीच आम्हाला हवे आहेत अशी उस्फूर्त भावना व्यक्त केली. मोदी सरकार आल्यानंतर देशातील विमानतळांची संख्या वाढली आहे. भारत आता जगातील पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था आहे तर डिजिटल आर्थिक व्यवहारांमधे जगात नंबर 1 आहे.

### वंचित घटकांपर्यंत मोदींच्या योजना

अमित गोरखे बोलताना म्हणाले की, आज पिंपरी विधानसभा क्षेत्रात सर्व पदाधिकारी कार्यकर्ते व नगरसेवकांबरोबर लाभार्थी संपर्क अभियानात फिरत असताना खऱ्या अर्थाने अगदी वंचित घटकांपर्यंत मोदीजींनी आखलेल्या योजना पोचल्याचा आनंद व समाधान व्यक्त झाले. मोदीजींनी अनेक योजना व कामे केली त्यात प्रामुख्याने प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत 80 कोटीहून अधिक नागरिकांना मोफत अन्नधान्य वितरण करण्यात आले. तसेच प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत 4 कोटीहून अधिक गरिबांना कायमस्वरूपी घरे मिळाली. जल जीवन मिशन अंतर्गत 14 कोटीहून अधिक घरांमध्ये नळाचे पाणी आणि 100% घरांमध्ये वीज पोहोचली. प्रधानमंत्री स्व निधी योजनेअंतर्गत 53 लाख फेरीवाले, विक्रेत्यांना कर्ज वाटप करण्यात आले. 51 कोटीहून अधिक जनधन खाती उघडून गरिबांना बँकिंग व्यवहार प्रवाहात आणले गेले. पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत 11.8 कोटी अधिक शेतकऱ्यांना दोन लाख 80 हजार कोटी रुपयाहून अधिक थेट आर्थिक मदत करण्यात आली. महिलांसाठी उज्वला योजना अंतर्गत 10 कोटी हून अधिक मोफत (गॅस) LPG कनेक्शन दिले आणि 12 कोटी शौचालय बांधण्यात आले. आयुष्मान भारत अंतर्गत 55 कोटी लाभार्थ्यांना पाच लाख रुपयांचे आरोग्य कवच सुद्धा या योजनेतून देण्यात आले. त्याचबरोबर पायाभूत सुविधांचा अभूत पूर्वक विकास घडऊन आणला.

# दुःखाला पकडून ठेवणे हेच जीवनातील मोठे दुःख!

## प्रवीण ऋषी म. सा. : सुखी धर्मसभा मंडप येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

**पिंपरी | प्रतिनिधी**

सुख आणि दुःख या दोन बाजू आहेत, मात्र आपण दुःखाला पकडून ठेवतो हेच जीवनाचे खरे दुःख आहे. मनात जास्त काळ विचारांचा कचरा भरून ठेवणे चुकीचे आहे असे विचार जैन मुनी उपाध्याय प्रवर प्रवीण ऋषी महाराज यांनी मांडले. होळी चातुर्मास निमित्त चिंचवड स्टेशन येथील सुखी धर्मसभा मंडप येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन सकल पिंपरी-चिंचवड संघाच्या वतीने करण्यात आले आहे.

आज प्रवचन देताना जीवनात येणाऱ्या कटु प्रसंगाला आपण विसरले





पाहीजे व राग, द्वेश सोडून प्रेमाने वागले पाहिजे. एकदा केलेली चूक पुन्हा पुन्हा त्याचे परिणाम भोगावे लागतात. मनात असलेले वैरभाव जास्त काळ टिकून ठेवणे त्रासदायक ठरते. यासाठी योग्य गुरुंचे सानिध्य व मार्गदर्शन जीवनाला दिशा देतात. याबाबत म.सा.यांनी आपले विचार मांडले. कार्यक्रमाची सुरवात अर्हम ब्लिसफुल कपल शिबीराने झाली. होली चातुर्मास निम्मित विशेष प्रवचन, विशेष कार्यक्रम 'उड़ान' अंतर्गत युवकांना विषेश व्यासपीठ तयार करून दिले.

### जैन समाज बांधवांना आवाहन...

दुपारी गौतम प्रसादी चे आयोजन सुशीला खींवराज मुथा परिवाराच्या वतीने करण्यात आले. गौतम निधी परिवाराचे संमेलन घेण्यात आले.अर्हम नाईट या कार्यक्रमा साठी मधुर कंठी तीर्थेश ऋषी म.सा. यांनी धर्मचर्चा केली. श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघ चिंचवड गाव व चिंचवड स्टेशन यांनी कार्यक्रमासाठी योगदान दिले. कस्ना डायग्नोस्टिक चे राजेंद्र मुथा व परिवाराने कार्यक्रमासाठी विशेष आयोजन केले. २८ तारखेला आचार्य राष्ट्र संत आनंद ऋषिजी म.सा.यांच्या पुण्यतिथि निमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ जास्तीत जास्त बांधवांनी घ्यावा असे आवहन सकल संघ्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# निवडणुक गैरप्रकारांवर 264 पथकांची देखरेख

## जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी अधिकारात जिल्हास्तरावर समन्वय अधिकारी

**पुणे| प्रतिनिधी**

देशात लोकसभा निवडणुकांचं मतदान होणार आहे. तर 4 जूनला मतमोजणी होऊन निकाल जाहीर केला जाईल. केंद्रीय निवडणूक आयोगाचे मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज लोकसभा निवडणुकांचं हे वेळापत्रक जाहीर केलं. राज्यात एकूण पाच टप्प्यात मतदान होणार आहे. 19 एप्रिल, 26 एप्रिल, 7 मे, 13 मे, 20 मे या पाच टप्प्यात राज्यात मतदान होणार आहे. मुंबई आणि एमएमआरमध्ये 20 मे या दिवशी म्हणजेच अखेरच्या टप्प्यात मतदान होईल.




खर्च संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अधिकारात जिल्हास्तरावर समन्वय अधिकारी नेमण्यात आले आहेत. लोकसभा निवडणुकीत उमेदवार आणि राजकीय पक्षांच्या निवडणूक खर्चावर आणि निवडणुकीतील गैरप्रकारांवर लक्ष ठेवण्यासाठी १३५ भरारी पथके आणि १२९ स्थिर सर्वेक्षण पथकांची स्थापन करण्यात आली आहे. खर्च संनियंत्रणासाठी जिल्हाधिकारी आणि जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या अधिकारात जिल्हास्तरावर समन्वय अधिकारी नेमण्यात आले आहेत. प्रत्येक मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकारी स्तरावर खर्च पथक नेमण्यात आले आहे. या पथकाचे काम अन्य विविध पथकांच्या समन्वयाने चालते. भरारी पथक (एफएसटी), स्थिर सर्वेक्षण पथक (एसएसटी), व्हिडीओ सर्वेक्षण पथक (व्हिएसटी), व्हिडीओ पाहणी पथक (व्हिव्हिटी), माध्यम संनियंत्रण आणि प्रमाणीकरण समिती (एमसीएमसी), जिल्हा नियंत्रण कक्ष, तक्रार संनियंत्रण कक्ष आदीदेखील खर्च पथकाला सहकार्य करतात. तसेच त्यासाठी आयकर विभाग आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचीदेखील या कामात मदत घेतली जाते.

जिल्ह्यातील चार लोकसभा मतदार संघांतर्गत २१ विधानसभा मतदार संघात मिळून एकूण १३५ एफएसटी पथक आणि १२९ एसएसटी पथके स्थापन करण्यात आली आहेत.

### निवडणूक खर्चाची नोंदणी...

उमेदवार, राजकीय पक्षांच्या प्रचाराच्या सर्व जाहीर सभा, रॅली यांचे व्हिडीओ चित्रीकरण व्हीएसटीच्या माध्यमातून केले जाते, त्याची पाहणी व्हिव्हिटीकडून केली जाते. प्रत्येक विधानसभा मतदारसंघात ३ व्हिएसटी आणि २ व्हीव्हीटी नेमण्यात आल्या आहेत. या पथकाची निरीक्षणे खर्च पथकासाठी उपयुक्त ठरतात. एमसीएमसीद्वारे उमेदवारांच्या वृत्तपत्रे तसेच इलेक्ट्रॉनिक माध्यमातील जाहिरात खर्चाचा अहवाल समितीकडे पाठविला जातो. या विविध माध्यमातून उमेदवारांनी दर्शविलेला निवडणूक खर्चाची पडताळणी केली जाते. खर्च दर्शविण्यात आला नसल्यास त्याबाबतची नोटीस देऊन त्याच्या निवडणूक खर्चात समाविष्ट केला जातो.

भोर मतदार संघात १५ आणि इतर २० मतदार संघात प्रत्येकी ६ एफएसटी स्थापन करण्यात आली आहेत. तसेच भोर विधानसभा मतदार संघात ९ आणि उर्वरित विधानसभा मतदार संघांमध्ये प्रत्येकी ६ एसएसटी स्थापन करण्यात आली आहेत. या पथकांद्वारे मतदारांना प्रभावित करण्यासाठीची रोकड, मद्य, तसेच प्रतिबंधित पदार्थांच्या वाहतुकीस आळा घालणे, आचारसंहिता भंगाबाबत घटनांवर लक्ष देणे, निवडणुकीतील गैरप्रकारांची माहिती घेणे, सिव्हिजिल आणि नियंत्रण कक्षाकडे आलेल्या तक्रारींवर कार्यवाही आदी कामे करण्यात येतात.

# मुरलीधर मोहोळांना 2 लाखांचं लीड देणार?

## खासदार मेधा कुलकर्णी यांचा निर्धार : पुणे लोकसभा निवडणूक प्राचारला वेग

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदार संघात भाजपा महायुतीचे उमेदवार माजी महापौर मुरलीधर मोहोळ आणि महाविकास आघाडीचे उमेदवार आमदार रवींद्र धंगेकर यांच्यातील लढत नक्की झाल्यानंतर प्रचाराचा वेग हळूहळू वाढी लागला आहे. मुरलीधर मोहोळ यांचे नाव लवकर जाहीर झाल्याने त्यांच्या भेटीगाठी, पक्षाचे मेळावे सुरू झाले आहे. भाजपचा गड मानला जाणारा कोथरूड मतदार संघात नुकताच बूथ प्रमुखांचा मेळावा पार पडला. या मेळाव्यात मार्गदर्शन करताना खा. मेधा कुलकर्णी यांनी मोहोळ यांना कोथरूडमधून २ लाख मतांचे मताधिक्य मिळवून देण्याचा निर्धार व्यक्त केला.



कोथरूडच्या माजी आमदार मेधा कुलकर्णी यांची राज्यसभेवर वर्णी लागल्यामुळे नाराज असलेल्या खा. मेधा कुलकर्णी आता मोहोळ यांना कोथरूडमधून मोठे मताधिक्य मिळवून देण्यासाठी सरसावल्या आहेत. कोथरूड मतदार संघात ब्राह्मण वर्ग मोठ्या प्रमाणात आहे. तसेच खा. मेधा कुलकर्णी यांना माननारा मोठा वर्ग आहे. खा. मेधा कुलकर्णी यांना डावलल्याची भावना या वर्गात होती. परंतु, खा. कुलकर्णी यांची राज्यसभेवर वर्णी लागल्याने या वर्गात आनंदाचे आणि उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. तर स्वत: खा. मेधा कुलकर्णी सरसावल्या आहेत.

पुणे लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने कोथरूड बूथ प्रमुखांचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी कोथरूडमधील सर्व सक्षम पदाधिकारी आणि बूथ प्रमुखांना खा. मेधा कुलकर्णी यांनी मोहोळ यांना कोथरूड मतदार संघातून २ लाखापेक्षा जास्त मताधिक्य देण्याचे लक्ष्य ठेवावे, असे आवाहन केले. त्या म्हणाल्या, २०१४ साली युती नसताना या विधानसभेत नागरिकांनी मला सुमारे ६५ हजार मताधिक्य देऊन आशीर्वाद दिले होते. सरळ सरळ झालेल्या मतदानाच्या ५१ टक्के मतदान भाजपाला मिळाले होते. स्व. गिरीश बापट यांच्या २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत कोथरूड मतदार संघातून १ लाख ६ हजार मताधिक्य मिळवून देण्यात आम्ही यशस्वी झालो होतो. आत्ताच्या नवीन परिस्थितीत महायुतीमधील पक्ष समाविष्ट झाले आहेत. त्यामुळे आता २ लाखाचे लक्ष्य सक्षम पदाधिकाऱ्यांच्या परिश्रमातून नक्की गाठू असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### मोहोळ यांच्या प्रचारासाठी सरसावले मल्ल

महाराष्ट्र केसरी विकी बनकर म्हणाले, आमच्या पैलवानांपैकी एक पैलवान थेट दिल्लीत जाणार आहे. ही आम्हा सर्वांसाठीच मोठी समाधानाची बाब आहे. म्हणून मोहोळ यांच्या विजयात आपलाही वाटा असावा अशी प्रत्येक पैलवानाची भावना आहे. म्हणूनच आम्ही एकवटलो आहोत. आम्ही एकत्रित येत जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी नियोजन करत असून यात हजारो पैलवान सहभागी होत आहेत. मोहोळ यांचे मताधिक्य वाढवणे ही आता आमची जबाबदारी आहे आणि ती आम्ही यसस्वीपणे पार पाडू, हा विश्वास आहे'.

हिंद केसरी पै. योगेश दोडके म्हणाले, 'मोहोळ यांना मिळालेली उमेदवारी ही आम्हा सर्व पैलवानांचा सन्मान आहे. ते लोकसभेत गेल्यावर आम्हा पैलवानांचे प्रश्न पोटतिडकीने मांडतील आणि ते सोडवण्यासाठी प्रामाणिक पाठपुरावा करतील, हा विश्वास आहे. म्हणूनच आम्ही सर्वांनी मोहोळ यांच्या पाठिशी ठामपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला आहे'.

मुरलीधर मोहोळ म्हणाले, 'लाल मातीशी नाते असणारा माझा परिवार एकवटला असून सर्वजण त्यांच्या पातळीवर प्रचारासाठी सज्ज होत आहेत. येत्या कालावधी ८ ते ९ हजार पैलवान स्वयंस्फूर्तीने प्रचारात सहभागी होणार आहेत. विशेष म्हणजे माझा सर्व पैलवान परिवार माझ्या उमेदवारीच्या निमित्ताने एकत्र आला आहे, ही निश्चितच आनंदाची बाब आहे.

# तुमच्याकडे पैलवान; माझ्याकडे वस्ताद!

## पुणे लोकसभा निवडणूक : काँग्रेसचे रविंद्र धंगेकर यांचे भाजपाच्या मुरलीधर मोहोळ यांना प्रत्यूत्तर



**पुणे | प्रतिनिधी**

काँग्रेसने महाराष्ट्रातील लोकसभा उमेदवारीची पहिली यादी जाहीर केली असून, पुण्यातून विद्यमान आमदार रवींद्र धंगेकर यांची उमेदवारी जाहीर झाली आहे. गेल्या आठवडाभरापासून धंगेकर यांच्या नावाची शहरभर चर्चा होती. अखेर त्याला पूर्णविराम मिळाला आहे. त्यामुळे आता पुण्यात धंगेकर विरुद्ध मुरलीधर मोहोळ अशी लोकसभेची लढत रंगणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

भाजपने त्यांच्या दुसऱ्या यादीत पुण्याची उमेदवारी माजी महापौर मुरलीधर मोहोळ यांना जाहीर केली होती. मात्र, काँग्रेसने महाराष्ट्रातील एकही जागा जाहीर केली नव्हती. गुरुवारी (दि. २१) सात जागांची उमेदवारी जाहीर करण्यात आली. त्यातील एक नाव पुण्यातील धंगेकर यांचे आहे. धंगेकर हे सध्या कसबा विधानसभा मतदारसंघाचे विद्यमान आमदार आहेत.

गिरीश बापट खासदार झाल्यानंतर कसबा विधानसभा मतदारसंघात झालेल्या पोटनिवडणुकीत नगरसेवक पदावरील धंगेकर यांनी भाजपच्या बालेकिल्ल्याला भगदाड पाडण्यात यश मिळवले होते. त्यांनी भाजपच्या हेमंत रासने यांचा पराभव करत आमदारकी मिळविली होती.

दरम्यान, नुकतंच रवींद्र धंगेकर यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली आहे. उमेदवारी मिळाल्याबाबत सदिच्छा भेट आणि मार्गदर्शनासाठी ही भेट होती. त्यासोबत शरद पवार यांची मदत येणाऱ्या लोकसभेसाठी लागणार असल्याचंही त्यांनी सांगितलं आहे. शरद पवारांसोबत भेट झाल्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांना डिवचले आहे.

"त्यांच्याकडे जर पैलवान प्रचाराला असतील, तर माझ्यासोबत वस्ताद आहेत. त्यामुळे कोणी प्रचाराला आलं तरी एवढा काही फरक पडणार नाही," असं म्हणत धंगेकरांनी मोहोळ यांच्यावर मिश्किल टिपण्णी केली आहे. यावेळी रवींद्र धंगेकर यांच्या सोबत काँग्रेस नेते मोहन जोशी, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे शहर अध्यक्ष प्रशांत जगताप, काँग्रेस कार्यकर्ते रोहन सुरवसे पाटील आणि इतर नेते उपस्थित होते.

भेट झाल्यानंतर धंगेकर यांना प्रश्न करण्यात आला होता की प्रतिस्पर्धी मुरलीधर मोहोळ यांनी प्रचारासाठी पैलवान आखाड्यात उतरवले आहेत. त्यावर धंगेकर म्हणाले, "हे क्षेत्रच बजरंगबली आखाडा आहे. पैलवान हे सर्व सामान्य घरण्यातून गरीबी कुटिबंतून आले असतात पण मुरलीधर मोहोळ यांनी कधी पैलवानांना दूध पाजलं का?

त्यांनी पालिका अधिकारी व्यास यांना दूध पाजलं त्यांनी बिल्डरांना दूध पाजलं, त्यांनी कधी आमच्या गरीब पैलवानांना अर्धा लिटर दुध पाजलं नाही, आणि त्यांच्या कडे पैलवान आले तरी आमच्याकडे वस्ताद आहे. असं शरद पवार यांना उद्देशून म्हणत मुरलीधर मोहोळ यांच्यावर पहिला वार केला.

# ... अन् वाचले चिमुकलीचे प्राण!

## वाकडमध्ये बस रिव्हर्स घेताना अनर्थ टळला




**पिंपरी | प्रतिनिधी**

चालक बस रिव्हर्स घेत असतो बसमागे पाईपवर बसलेली लहानगी काव्या (बदललेले नाव) त्याच्या दृष्टीपथास पडत नाही आणि ती थेट रिव्हर्स येणाऱ्या बसखाली जाते. तेंव्हा जवळच जॉगिंग करणाऱ्या मेघा यांनी हे पाहून समयसूचकता दाखवीत कशाचीही पर्वा न करता जिवाच्या आकांताने पळ काढला. बस चालकाला बस थांबविण्यास सांगीतले बस थांबताच सर्वांनी काव्याला बस खालून सुखरूप बाहेर काढले.

अगदी क्षणाचाही विलंब झाला असता तर मोठा अनर्थ झाला असता. मात्र, ऐनवेळी जणू देवदूत बणून आलेल्या मेघा विजय नलगे ह्या महिलेच्या प्रसंगावधानामुळे त्या चिमूरडीचे प्राण वाचले एवढेच नव्हे तर तीला साधे खरचटले देखील नाही.

यामुळे मेघा यांच्या धाडसाचे सर्वत्र कौतुक होत असून देव तारी त्याला कोण मारी याचा प्रत्येय आल्याची चर्चा परिसरात सुरु आहे.

कस्पटे वस्ती, वाकड येथील दक्षता नगर, सोसायटीच्या आवारात शुक्रवारी (ता. २२) सकाळी सातच्या सुमारास ही आश्चर्यकारक घडना घडली. याबाबत माहिती अशी, इयत्ता दुसरीत शिकणारी काव्या नेहमीप्रमाणे स्कुलबसची वाट पाहत सोसायटी गेट समोरील मोठ्या पाईपवर बसली होती यावेळी तीचे पालकही सोबत होते.

काही कामानिमित्त तीची आई क्षणभरासाठी बाजूला जाते आणि तेवढ्यातच ही थरारक घटना घडते. हा सर्व घटनाक्रम सीसीटीव्हीत कैद झाला आहे. त्या मुलीला बस खालून काढण्यासाठी स्नेहल गवळी, आशा तोरडमल, प्रियांका पवार यांनी मदत केली.



# दगडुशेठ हलवाई गणपतीला 2 हजार किलो द्राक्षांचीआरास

**पुणे। प्रतिनिधी**

होळीपौर्णिमेनिमित्त श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरातील गाभारा आणि सभामंडप द्राक्षांनी सजविण्यात आला असून २ हजार किलो द्राक्षांची आरास करण्यात आली आहे. तर ही द्राक्षांची आरास पाहण्यास पुणेकरांनी एकच गर्दी केली आहे.

यावेळी ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण म्हणाले की, प्राचीन भारतीय आयुर्वेदात द्राक्षांचे आरोग्याच्या दृष्टीने महत्त्व मोठे आहे. द्राक्षांमध्ये पोटॅशियम, मॅग्नेशियम, कॅल्शियम आणि क जीवनसत्त्वाचे चांगले स्त्रोत आहेत. द्राक्षे हृदयविकाराचा धोका कमी करतात. त्याच्या सेवनाने मेंदूवर वयाचा कमी परिणाम होतो. द्राक्षांमध्ये भरपूर फायबर असते, जे वजन कमी करण्यास मदत करते.

हिरवी द्राक्षे खाल्ल्याने बद्धकोष्ठतेच्या समस्येपासूनही आराम मिळतो. द्राक्षांमध्ये असलेल्या फायबरमुळे आतड्याची हालचाल सुलभ होते. तसेच शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. हे हिमोग्लोबिन पातळी वाढवते. हिरवी द्राक्षे हिमोग्लोबिन वाढवतात. त्यामुळे द्राक्षांचे सेवन करणे हे आरोग्यदृष्ट्या उपयुक्त असल्याने अनाथाश्रम, वृद्धाश्रम आणि ससून रुग्णालयात द्राक्षांचे प्रसाद म्हणून वाटप करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# अपक्ष निवडणूक लढवणार: शिवतारे

## बारामती लोकसभा मतदारसंघ : 12 तारखेला 12 वाजता उमेदवारी अर्ज दाखल करणार



**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून बारामती लोकसभा मतदारसंघ चांगलाच चर्चेत आहे. बारामतीत नणंद-भावजय अर्थात सुप्रिया सुळे आणि सुनेत्रा पवार असा सामना रंगणार आहे. आता बारामती मतदारसंघातून शिवसेना नेते विजय शिवतारे यांनीही अपक्ष निवडणूक लढवणार असल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे बारामतीत तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. विजय शिवतारे यांनी बारामतीमधून लोकसभा निवडणूक लढवू नये, यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांच्याशी बैठक घेत चर्चा केली होती. पण यानंतरही विजय शिवतारे यांनी कार्यकर्त्यांची बैठक घेत आपण १ एप्रिलला प्रचाराला सुरुवात करणार असल्याची घोषणा केली.

“बारामती नाही तर संपूर्ण महाराष्ट्रातून लोक मला फोन करत आहेत, ही लढाई लढण्यासाठी सांगत आहेत. विजय शिवतारे खुन्नस म्हणून अजित पवारांच्या विरोधात उभे राहिले आहेत, असा संभ्रम राष्ट्रवादीकडून तयार केला जात आहे. मी शरद पवारांचा हस्तक झालो आहे, असेही म्हणतात. सुनील तटकरे तर असे म्हणाले की, विजय शिवतारे कोणाची स्क्रिप्ट वाचतोय. पण मी आज कार्यकर्त्यांना सांगतोय, आपण असा नीचपणा करणार नाही. आपण घराणेशाही आणि झुंडशाहीच्या विरोधात लढत आहोत”, असे विजय शिवतारे म्हणाले. “विजय शिवतारे जनतेची लढाई म्हणून या निवडणुकीत उतरला आहे. सर्वसामान्य माणसांचे एक नवीन पर्व सुरू करण्यासाठी ही लढाई लढत आहे. पवार पर्व संपविण्यासाठी ही लढाई सुरू आहे. पवार म्हणजे आडनाव नाही तर ही झुंडशाही, घराणेशाही आहे. ४० वर्ष आम्ही यांनाच का मतदान करायचे? हा प्रश्न मतदारसंघातील अनेकांनी मला विचारला. शरद पवार, अजित पवार यांनी आम्हाला काय दिले? पुणे जिल्ह्यात पवार कुटुंब सोडून दुसरा कोणी मोठा होऊ नये, म्हणून त्यांनी सर्वांचे पाय कापण्याचे प्रयत्न केले”, अशी टीका विजय शिवतारे यांनी केली. १ एप्रिलला प्रचाराला सुरुवात करणार?

“१ एप्रिल रोजी आम्ही प्रचाराला सुरुवात करत निवडणुकीचे रणशिंग फुंकणार आहोत. कोणाला हरविण्यासाठी नाही तर घराणेशाही आणि झुंडशाही संपविण्यासाठी ही लढाई लढणार आहोत. १ एप्रिलला माऊलींच्या पालखी तळावर कमीत कमी ५० ते ६० हजारांची मोठी सभा घेणार आहे. माझ्याकडे कोणताही पक्ष नाही, माझ्याकडे फक्त सर्वसामान्य जनता आहे. पाचही विधानसभा मतदारसंघात अशा सभा घेतल्या जातील.

### शिवसेनेचा राजीनामा देणार का?

विजय शिवतारे हे अपक्ष निवडणूक लढविणार असल्याची घोषणा त्यांनी स्वत:च केली. याचवेळी शिवसेनेचा राजीनामा देणार का? असा प्रश्न विचारण्यात आला असता विजय शिवतारे म्हणाले, “हा शुल्लक प्रश्न विचारू नका. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे माझ्यावर काही कारवाई घेऊ शकतात. पण त्यांना देखील माझा हेतू माहिती आहे. माझा हेतू सर्वांना पटलेला आहे. मी जनतेसाठी फासावर जायलाही तयार आहे”, असे विजय शिवतारे म्हणाले.

# सुळे पवारांचा जोरदार प्रचार;'पाल्म संडे'ला मुहूर्त

## सुनेत्रा पवार ,सुप्रिया सुळे यांच्या स्वतंत्ररित्या दौंड शहरातील ख्रिस्ती बांधवांच्या गाठीभेटी





**पुणे| प्रतिनिधी**

ख्रिस्ती बांधवांच्या झावळ्याचा रविवार ( पाल्म संडे ) या उत्सवानिमित्त ख्रिस्ती बांधवांना शुभेच्छा देण्यासाठी बारामती लोकसभा मतदारसंघातील दोन संभाव्य महिला उमेदवार दौंड शहरात आले होते.

संभाव्य उमेदवार तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार आणि त्यांच्या नणंद तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी स्वतंत्ररित्या दौंड शहरातील ख्रिस्ती बांधवांच्या या निमित्त गाठीभेटी घेत शुभेच्छा दिल्या

प्रभू येशू ख्रिस्त यांचा जेरूसलेम मधील प्रवेशाचा जयोत्सव तेथील नागरिकांनी हातात खजुराच्या झावळ्या घेत केला होता. त्या जयोत्सवाचे स्मरण करून पवित्र सप्ताह साजरा करण्यासाठी गुड फ्रायडे अगोदरील रविवार हा झावळ्याचा रविवार ( पाल्म संडे ) म्हणून साजरा केला जातो.

पुणे जिल्ह्यातील दौंड शहरात आज दरवर्षीप्रमाणे ख्रिस्ती बांधवांनी झावळ्याचा रविवार निमित्त सवाद्य प्रभातफेरी काढून प्रभू येशू ख्रिस्त यांचा जयघोष केला. झावळ्या हातात घेऊन ' होसन्ना, होसन्ना, प्रभूच्या नावाने येणारा राजा धन्यवादित असो ! ' असा जयघोष करण्यात आला.

### 'पाल्म संडे' या सणाचे महत्व...

सर्वसामान्यपणे येशू ख्रिस्त यांना मानवतेचा अवतार मानला जातो, ज्यांनी मानवाच्या कल्याणासाठी हसता हसत सुळावर जाणे पसंत केले. काही ठिकाणी असेही म्हटले जाते की गुड फ्रायडे च्या दिवशी येशूला वधस्तंभावर चढवण्यात आले, त्याच्या आदल्या रविवारी येशूचे जेरुसलेम नगरीत आगमन झाले होते. येशूचा नगरीत झालेला प्रवेश हा तिथल्या नागरिकांनी खजुराची पाने दाखवून साजरा केला होता. त्या दिवसाची आठवण म्हणून आजही जगभरातील ख्रिस्ती बांधव हा दिवस 'पाम रविवार' किंवा 'पाम संडे' म्हणून साजरा करतात. 'पाम